# जाहिरात
## पुणे जिल्हा परिषद, पुणे
## सामान्य प्रशासन विभाग

पुणे जिल्हा परिषद पुणे अंतर्गत जिल्हा व तालुका स्तरावरील प्रलंबीत असलेल्या विविध न्यायालयीन प्रकरणांमध्ये जिल्हा परिषदेची बाजू विविध स्तरावरील (मे. सर्वोच्च न्यायालय,मे उच्च न्यायालय,मे. कॅट / मॅट कोर्ट,मे. जिल्हा न्यायालय,इ.) न्यायालयामध्ये प्रभावीपणे मांडण्यासाठी तसेचविविध न्यायालयातील सर्व प्रकरणांच्या कायदे विषयक बाबी बाबत/न्यायालयीन प्रकरणे,सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे न्यायालयीन कामकाजाकरिता ॲडव्होकेट पॅनेल वर खालीलप्रमाणे विधी तज्ञांची नियुक्ती करावयाची आहे. त्यासाठी ॲडव्होकेट पॅनलवर खालील प्रमाणे वकील नियुक्तीसाठी इच्छूक उमेदवारांकडून अर्ज मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | न्यायालय | नियुक्ती करावयाच्या वकीलांची संख्या | अर्जदारा साठी आवश्यक अनुभव |
|---|---|---|---|
| १ | मे. सर्वोच्च् न्यायालय, नवी दिल्ली | २ | **मा.सर्वोच्च न्यायालयात १० वर्षे** |
| २ | मे उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद व नागपूर | ७ | **मा.उच्च न्यायालयात १० वर्षे** |
| ३ | मे. कॅट / मॅट कोर्ट मुंबई | २ | **मा.कॅट/मॅट न्यायालयात १० वर्षे** |
| ४ | मे. जिल्हा न्यायालय पुणे वरिष्ठ्/कनिष्ठ् स्तर | १० | **मा.जिल्हा न्यायालयात १५ वर्षे** |
| ५ | मे. कामगार न्यायालय / औद्योगिक न्यायालय स्वारगेट पुणे | ६ | **मा.कामगार न्यायालयात १५ वर्षे** |
| ६ | मे. प्रत्येक तालुक्यासाठी स्थानिक स्तरावर प्रत्येकी दोन वकील | २६ | **मा.स्थानिक कोर्टात२० वर्षे** |

**<u>अटीवशर्ती:-</u>**

१) अर्जदार हा भारतीय नागरीक असावा.
२) मान्यता प्राप्त विद्यापीठाची विधी शाखेची पदवी असावी.
३) अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकास अर्जदाराचे वय किमान ३३ वर्षे पुर्ण असावे.
४) अर्जदार यांनी सनद धारण केलेली असावी.
५) अर्जदाराचा वकील व्यवसायाचा वरील तक्त्याप्रमाणे अनुभव आवश्यक राहील.
६) अर्जदारास मराठी, हिंदी व इंगजी भाषेचे ज्ञान पुरेसे असणे आवश्यक आहे.

७) जिल्हा परिषद वकील पॅनेल यापूर्वी नियुक्ती असलेल्या अर्जदारास त्यांचेकडे सोपविण्यात आलेल्या प्रकरणांचे निकाल जिल्हा परिषदेच्या बाजूने झालेबाबतचे प्रमाण विचारात घेवून पुन्हा नियूक्ती बाबत विचार करता येईल. याबाबतचा तपशील त्यांनी अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

८) जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रत्येक न्यायालय कामकाजाकरिता स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक आहे.**तथापि एकापेक्षा अधिक न्यायालयासाठी निवड केली जाणार नाही.**

९) अर्जदारास फौजदारी गुन्हा विषयक, सेवाविषयक, प्रशासकीय,दिवाणी व महसूल विषयक अशा प्रकारच्या कायद्याची स्थिती विभागीय चौकश्या इत्यादी बाबतीत पुरेसे ज्ञान संपन्न असावा.

१०) निवड करण्यात आलेल्या उमेदवाराकडून विहीत केलेल्या नमुन्यात करारपत्र (Agreement) करुन घेण्यात येईल.

**अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे**

१) शैक्षणिक अर्हतेसंदर्भात सर्व कागदपत्रे,विधी शाखेचे प्रमाणपत्र,बार कौन्सिलचे प्रमाणपत्र,(सदर कागदपत्रांची अर्जासोबत साक्षांकित प्रत सादर करणेत यावी)

२) वयाच्या पुराव्याकरिता माध्यमिक शाळा उत्तीर्ण प्रमाणपत्र अथवा इतर समकक्ष पुरावा.

३) न्यायालयामध्ये दावे चालविण्याचा **विहित** अनुभव असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करावे.

४) **उमेदवारांनी त्यांचे अनुभवाबाबतचे स्व-साक्षांकनाचे घोषणापत्र सादर करावे.**

**निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया**

१) **प्राप्त अर्जाची छाननी करुन मुलाखतीसाठी पात्र अर्जदारांची मुलाखतीची यादी या कार्यालयाच्या सूचना फलकावर तसेच पुणे जिल्हा परिषद,पुणे यांच्या वेबसाईटवर www.punezp.org प्रसिध्द केली जाईल. तसेच अर्जदारांना त्यांच्या इमेल आयडीवर कळविणेत येईल.**

२) **अर्जदारांची निवड ही मुलाखतीद्वारे करण्यात येईल. मुलाखतीचा दिनांक उमदेवारांना त्यांनी नमूद केलेल्या व ईमेल आयडीनुसार यथावकाश कळविणेत येईल.**

३) मुलाखतीस जे उमदेवार उपस्थित राहणार नाहीत, अशा अर्जदारांचा पुनः□□□ मुलाखतीसाठी विचार केला जाणार नाही.

४) मुलाखतीस येताना मुळ कागदपत्रे आणणे आवश्यक आहे.

५) अर्जदार यांना मुलाखतीस येताना कोणत्याही प्रकारचा प्रवास खर्च अनुज्ञेय राहणार नाही.

६) ॲडव्होकेट पॅनल निवडीसाठी गठीत केलेल्या समिती मार्फत मुलाखतीद्वारे उमेदवारांची निवड केली जाईल. **मुलाखतीचे गुणांकन करताना विचारात घ्यावयाच्या बाबीं व कोणत्या**

**बाबींस किती गुण द्यावेत हे ठरवण्याचा तसेच विहित पात्रतेचे निकष पूर्ण करणा-या उमेदवारांमधून योग्य उमेदवार निवडी बाबत संपूर्ण अधिकार निवड समितीस राहतील.**

७) ॲडव्होकेट पॅनेलवर निवडीची प्रक्रिया कोणत्याही स्तरावर स्थगित करणे/तहकूब करणे/रद्द करणेचे अधिकार **मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.पुणे** यांचेकडे राखीव राहतील.

**वकील फीचे दर व त्याबाबतचे निकष**

ॲडव्होकेट पॅनेल वरीलनिवड केलेल्या वकीलांना खालीलप्रमाणे वकील फी अनुज्ञेय राहील.

**वकील फी चे दर व त्याबाबतचे निकष खालीलप्रमाणे असतील.**

| अ. क्र. | कामाकाजाची बाब | वकील फी (प्रति दावा) | इतर खर्च (प्रति दावा) | एकूण (प्रति दावा) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | सर्वोच्य न्यायालय नवी दिल्ली | ६५०००/- | १५०००/- | ८००००/- | दावा दाखल केल्यानंतर ५०% व निकालानंतर उर्वरीत ५०% |
| २ | मे. उच्च न्यायालय मुंबई/ औरंगाबाद /नागपूर | २००००/- | ५०००/- | २५०००/- | दावा दाखल केल्यानंतर ५०% व निकालानंतर उर्वरीत ५०% |
| ३ | मे. कॅट/ मॅट कोर्ट मुंबई | २००००/- | ५०००/- | २५०००/- | दावा दाखल केल्यानंतर ५०% व निकालानंतर उर्वरीत ५०% |
| ४ | मे. जिल्हा न्यायालय पुणे वरिष्ठ / कनिष्ठ स्तर | १५०००/- | ३०००/- | १८०००/- | दावा दाखल केल्यानंतर ५०% व निकालानंतर उर्वरीत ५०% |
| ५ | तालुकास्तर दिवाणी न्यायालय | १३०००/- | २०००/- | १५०००/- | दावा दाखल केल्यानंतर ५०% व निकालानंतर उर्वरीत ५०% |
| ६ | मे. कामगार न्यायालय / औद्योगिक न्यायालय स्वारगेट पुणे | १३०००/- | २०००/- | १५०००/- | दावा दाखल केल्यानंतर ५०% व निकालानंतर उर्वरीत ५०% |
| ७ | प्रत्येक तालुक्यासाठी तेथील स्थानिक दोन वकील | १३०००/- | २०००/- | १५०००/- | दावा दाखल केल्यानंतर ५०% व निकालानंतर उर्वरीत ५०% |
| ८ | कायदे विषयक अभिप्राय देणे | ३०००/- | - | ३०००/- | कार्यवाहीनंतर अदा करणे |
| ९ | कायदेशीर नोटीस देणे अथवा नोटीशीस उत्तर देणे | ५०००/- | ५००/- | ५५००/- | कार्यवाहीनंतर अदा करणे |
| १० | स्थानिक न्यायालयात कॅव्हिएट दाखल करणे | ३०००/- | - | ३०००/- | प्रती कॅव्हिएट खर्चासह कार्यवाहीनंतर अदा करणे |
| ११ | रिट याचिकेचे पॅरावाईज उत्तर तयार करणे | ५०००/- | - | ५०००/- | कार्यवाहीनंतर अदा करणे |

सदर बाबत इतर अनुषंगिक बाबी पुढीलप्रमाणे राहतील.

१) **ज्या दाव्यामध्ये जिल्हा परिषद वादी असेल त्या दाव्यामध्ये वरील प्रमाणे फी अनुज्ञेय राहील.**

२) **ज्या दाव्यामध्ये जिल्हा परिषद प्रतिवादी असेल अशा दाव्यामध्ये वरील मानधनामध्ये २०% कमी करणेत येईल.**

३) वकील फी व खर्चाच्या रक्कमा वरील तक्त्यात संबंधीत बाबीसमोर नमुद केल्याप्रमाणे आदा करण्यात येतील. वकील पत्र दाखल करुन लेखी म्हणणे (शपथ पत्र) दाखल केल्यानंतर प्रथम ५० टक्के अंतिम निकालानंतर उर्वरीत ५० टक्के रक्कम आदा करण्यात येईल तसेच दावा दाखल झालेच्या सुरुवातीच्या काळात पक्षकाराने दावा काढून घेतल्यास ५० टक्के च रक्कम आदा करण्यात येईल . परंतु दाव्याच्या शेवटच्या स्टेज पर्यंत दावा काढून घेतल्यास पुर्ण रक्कम आदा करण्यात येईल. दावा निकाली झाल्यानंतर दाव्याची प्रमाणित प्रत (**सर्टीफाईड कॉपी**) देण्याची जबाबदारी पॅनेलवरील वकीलांची राहील.

४) उपरोक्त नमुद अनुज्ञेय खर्चामध्ये कोर्टात सादर करावयाचे लेखी म्हणणे, जादा म्हणणे, दावा दुरुस्ती व वकीलांनी कोर्टात सादर करावयाचे अर्जाचे टायपींग, निकालाची प्रत मागुन घेणे इतर खर्चाचा समावेश आहे.जिल्हा परिषदेच्या वतीने रिट याचिका , दावा किंवा अपील दाखल करताना कोर्ट फी भरावी लागत असल्यास ती अतिरिक्त देय राहील.

५) सुपूर्द केलेल्या प्रकरणांनुसार काहीवेळा वकीलांना कार्यक्षेत्राबाहेरील कोर्टात उपस्थित राहुन काम पाहावे लागते अशा प्रकरणी प्रवास भत्ता, दैनिक भत्तावकील फी व्यतिरिक्त देय राहील. सदर भत्ता जिल्हा परिषदेकडील वर्ग -२ च्या अधिकाऱ्यांना देय असलेल्या दराने अदा करण्यात येईल. मात्र अशा प्रकरणी त्यांना नियुक्त केलेल्या कार्यक्षेत्राबाहेर न्यायालयात उपस्थित राहणेबाबत संबंधित खातेप्रमुखांची पूर्वसंमती घेणे आवश्यक राहील.

६) **जि.प.च्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे व संवेदनशील दाव्यामध्ये तसेच वर नमूद फी मध्ये प्रकरण परत्वे वाढ करणेचे अधिकार मा.स्थायी समितीस राहतील,पॅनेलमधील विशिष्ठ वकील अथवा पॅनेलव्यतिरिक्त विधीज्ञांची (वकीलांची) नियुक्ती करण्याचा व त्याची फी ठरविण्याचा अधिकार मा.स्थायी समितीला राहील.**

७) कोणत्या वकीलास कोणते व किती दावे द्यायचे याचा अधिकार **मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. यांना या संदर्भात सर्व वकीलांना समसमान पध्दतीने अथवा विशिष्ठ विभागांचे दावे विशिष्ठ वकीलांकडे देणे अथवा विशिष्ठ स्वरुपाचे दावे विशिष्ठ वकीलांकडे देणे यापैकी यथोचित कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात येईल.**

<u>ॲडव्होकेट पॅनेलवर नियुक्त वकीलांचे कर्तव्ये व जबाबदा-या</u>

१. पुणे जिल्हा परिषदेकडे प्राप्त होणा-या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबींबाबत/न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.

२. जिल्हा परिषद हिताचे संवर्धन होईल या दृष्टीने प्रशासकीय बाबींचे माहिती घेवून त्यास आवश्यक तो कायद्याचा आधार देवून जिल्हा परिषदेची बाजू पूर्ण प्रभावाने न्यायालयात मांडणे.
३. सेवाविषयक/प्रशासकीय बाबी/विभागीय चौकशी तथा समकालीन कायद्याची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.
४. प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढणेसाठी सरकारी वकीलाकडे पाठपुरावा करणे, जेथे शासन प्रतिवादी आहे अशा प्रकरणी सादर करावयाचे प्रतिज्ञापत्र संबंधित अधिका-याचे मदतीने तयार करणे.
५. जिल्हा परिषदेच्या हिताच्या दृष्टीने प्रकरणा बाबतचा आवश्यक ती गोपनीयता बाळगणे.
६. पॅनेलवर नियुक्त वकीलांना जिल्हा परिषद वादी/प्रतिवादी असलेलया प्रकरणी म्हणजेच जिल्हा परिषदेच्या विरोधात वकील पत्र घेता येणार नाही
७. जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे, अशा प्रकरणामध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करुन, तदनुषंगाने अपिल दाखल करण्याचे संदर्भात उचित कार्यवाही करणे.
८. पॅनेलवरील एखादा वकील त्यांच्याकडे सोपविलेल्या प्रकरणाच्या बाबतीत जिल्हा परिषदेची बाजू पुरेशा प्रभावने मांडत नसल्याची बाब निदर्शनास आल्यास त्यांचे सदर प्रकरणातील वकीलपत्र रद्द करण्यात येईल अथवा त्यांची पॅनेलवरील नियुक्ती संपुष्टात आणण्यात येईल.
९. पॅनेलवर नियुक्त वकीलांना केसचा विषय , केस संबंधीत विषयाच्या कामकाजातील नैपुण्यताइ. बाबींचा विचार करुन केसीस सुपूर्द केल्या जातील.
१०. जिल्हा परिषद स्तरावर बोलविण्यात येणाऱ्या वकीलांच्या सभांना उपस्थित राहुन त्यांच्याकडे सोपविलेल्या प्रकरणांच्या सद्यस्थिती विषयी माहितीचा अहवाल सादर करणे अनिवार्य राहील.
**११. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा संबंधित विभागाचे खातेप्रमुख यांनी एखाद्या दाव्यासंदर्भात चर्चा करणेकामी उपस्थित राहणेबाबत सूचित केल्यास पॅनलवरील वकीलांना दिलेल्या वेळेत उपस्थित राहणे बंधनकारक राहील.**
**१२. न्यायानयीन प्रकारणा संदर्भात वेळोवेळी झालेल्या सुनावणीचा अहवाल संक्षिप्त स्वरुपात सात दिवसाच्या आत प्रत्येक सुनावणीनंतर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर करणे बंधनकारक राहील.**

**<u>अर्जदारांना सर्वसाधारण सुचना :-</u>**

१) अर्जाचा नमुना पुणे जिल्हा परिषद,पुणेच्याwww.punezp.orgयावेबसाईटवर उपलब्ध आहे.
२) विहीत नमुन्यातील अर्ज परिपूर्ण भरुन लिफाफ्यावर उजव्या बाजूला ठळक अक्षरात **ॲडव्होकेट पॅनेल करिता नियुक्ती** असे नमूद करुन त्यावर पुढीलप्रमाणे पत्ता नमूद करावा. ***"मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे, सामान्य प्रशासन विभाग, यशवंतराव चव्हाण भवन, ६ वा मजला, १ वेलस्ली रोड, कँप पुणे, पुणे ४११००१"*** या पत्त्यावर पोहोचतील

अशा बेताने आर.पी.डी.द्वारे, समक्ष, अथवा कुरिअर द्वारे दिनांक २० / ९/२०१८ पर्यंत पोहोचणे आवश्यक राहील. विहित कालावधी नंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

३) सदर अर्जात अर्जदार यांनी त्याचे संपूर्ण नाव,टपालाचा पूर्ण पत्ता,पिन कोडसह,भ्रमणध्वनी/दुरध्वनी क्रमांक,ईमेल आयडी, शैक्षणिक अर्हता,अनुभव इत्यादी विषयक माहिती साक्षांकित प्रतीसह अर्जा सोबत सादर करावा.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**पुणे जिल्हा परिषद, पुणे**

## पुणे जिल्हा परिषद, पुणे अंतर्गत वकील पॅनल करीता सन २०१८ साठी नियुक्तीसाठी अर्ज

प्रति,
मा. मुख्य् कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, पुणे

| |
|---|
| फोटोवर स्वाक्षरी करुन या जागी चिकटवावा व दुसरा फोटो स्वाक्षरी करुन अर्जासोबत लिफाफ्यात जोडावा |

विषय - जिल्हा परिषद, पुणे वकील पॅनलवरील नियुक्ती बाबत
_________________________ या न्यायालयाकरीता अर्ज.

**अ)अर्जदाराचीवैयक्तीकमाहिती (योग्यअसेलत्याठिकाणी()खूणकरावी)**

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जदाराचे संपूर्ण नांव | **(मराठीत)** ____________ |
| | | **(इंग्रजीत)** **(Capital Letters Only)** ____________ |
| २ | पत्रव्यवहाराचा पत्ता | ____________<br>____________ |
| ३ | कायमचा पत्ता | ____________<br>____________ |
| ४ | दूरध्वनी क्रमांक /<br>मोबाईल क्र. | ____________<br>____________ |
| ५ | आधार क्रमांक | |
| ६ | पॅन क्रमांक | |
| ७ | इमेल आयडी | |

| | | |
|---|---|---|
| ८ | राष्ट्रीयत्व | |
| ९ | जन्म दिनांक | |
| १० | जन्मस्थळ | |
| ११ | दिनांक : ३१/०१/२०१८ रोजीचे वय | दि. ______ म. ______ व. ______ |
| | | |

**ब) अर्जदाराची शैक्षणिक माहिती**

| शिक्षण | शैक्षणिक संस्थेचे नाव(विद्यालय/ महाविद्यालय) | बोर्ड/ विद्यापीठ | उत्तीर्ण झाल्याचा दिनांक | मिळालेले गुण | मिळालेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १.माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इ.१० वी) | | | | | |
| २.उच्च माध्यामिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा(इ.१२वी) | | | | | |
| ३.पदवी | | | | | |
| ४.विधी पदवी | | | | | |
| **५.पदव्युत्तर** | | | | | |
| **६.अन्य पदव्या अथवा शैक्षणिक अर्हता** | | | | | |

इतर अर्हता

| | | |
|---|---|---|
| १) | संगणक परीक्षा उत्तीर्ण आहे काय? (**MS-CIT वा तत्सम**) | होय / नाही<br>असल्यास तपशिल द्यावा – |
| २) | भाषेचे ज्ञान<br>१. मराठी<br>२. हिंदी<br>३. इंग्रजी | <br>मौखिक - लेखी -<br>मौखिक - लेखी -<br>मौखिक - लेखी - |
| | | |

**क) व्यावसायिक पात्रता -**

| | | |
|---|---|---|
| १) | सनद घेतल्याचा दिनांक | |
| २) | पुढीलपैकी कोणत्या न्यायालयीन प्रकरणांमध्ये काम करणेस इच्छुक | **आस्थापना** -<br>दिवाणी -<br>फौजदारी – |

<table>
<tr><td></td><td>आहे?</td><td>औद्योगिक -<br>इतर (तपशिल नमूद करावा)</td></tr>
<tr><td>४)</td><td>वकील व्यवसायाचा अनुभवाचा तपशिल</td><td>
<table>
<tr><th rowspan="2">अ.क्र.</th><th rowspan="2">न्यायालयाचे नाव</th><th rowspan="2">केसेसचा प्रकार</th><th rowspan="2">केसेसच्या संख्या</th><th colspan="2">पैकी</th></tr>
<tr><th>बाजुने निकाल</th><th>विरोधात निर्णय</th></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
</table>
</td></tr>
<tr><td>५)</td><td>अ. यापूर्वी जिल्हा परिषदेच्या वकील पॅनेल वर काम केले असल्यास त्याचा तपशिल द्यावा.<br>(सोबत कागदपत्रे सादर करावीत)</td><td>
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>जिल्हा परिषदेच्या वतीने दाखल केलेलया दाव्यांची संख्या</th><th>जिल्हा परिषदेच्या बाजूने निर्णय लागलेल्या दाव्यांची संख्या</th><th>जिल्हा परिषदेच्या विरूध्द निर्णय लागलेल्या दाव्यांची संख्या</th><th>अद्याप प्रलंबित असलेल्या दाव्यांची संख्या</th></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
</table>
</td></tr>
<tr><td></td><td>ब) अन्य जिल्हा परिषदेच्या वकील पॅनलवर काम केले असल्यास त्याचा तपशिल द्यावा.<br>(सोबत कागदपत्रे सादर करावीत)</td><td>
<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>अन्य जिल्हा परिषदेचे नाव</th><th>जिल्हा परिषदेच्या वतीने दाखल केलेलया दाव्यांची संख्या</th><th>जिल्हा परिषदेच्या बाजूने निर्णय लागलेल्या दाव्यांची संख्या</th><th>जिल्हा परिषदेच्या विरूध्द निर्णय लागलेल्या दाव्यांची संख्या</th><th>अद्याप प्रलंबित असलेल्या दाव्यांची संख्या</th></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
</table>
</td></tr>
<tr><td></td><td>क) शासकीय अथवा निमशासकीय कार्यालयांच्या वकील पॅनलवर काम केले असल्यास त्याचा तपशिल द्यावा.<br>(सोबत कागदपत्रे सादर करावीत)</td><td>
<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>कार्यालयाचे नाव</th><th>कार्यालयाच्या वतीने दाखल केलेलया दाव्यांची संख्या</th><th>कार्यालयाच्या बाजूने निर्णय लागलेल्या दाव्यांची संख्या</th><th>कार्यालया विरूध्द निर्णय लागलेल्या दाव्यांची संख्या</th><th>अद्याप प्रलंबित असलेल्या दाव्यांची संख्या</th></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
</table>
</td></tr>
<tr><td>६)</td><td>अर्जदाराविरूध्द फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल असलयास त्याबाबतचा तपशिल व सद्यस्थिती</td><td></td></tr>
</table>

अर्जदाराची सही

# अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र

मी, श्री/सौ/कु.________________________________________________

याव्दारे प्रतिज्ञा पूर्वक असे जाहीर करतो/करते की, वरील माहिती जाणीवपुर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून ती खरी आहे.जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांवर व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. अर्जात नमूद केलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यास माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी निवड/नियुक्ती रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जात नमूद केलेली माहिती खोटी अथवा चुकीची असल्यास त्याची पुर्णतः जबाबदारी माझ्यावर राहील व त्याबाबतीत माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाईस मी पात्र राहीन. तसेच मी निवड प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचे वशिलेबाजी किंवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास मी अपात्र ठरेन.

ठिकाण :
दिनांक :

**अर्जदाराची सही**